# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

**दिनांक २९.०४.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २९.०४.२०२६ रोजी मा. प्रथम न्यायदंडाधिकारी, कोर्ट क्र. ०७, नागपुर, श्री. आर.एस. काळे साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ७४५७/२०१७ मधील, पोलीस ठाणे जरीपटका येथील अप. क्र. ५८/२०१७ कलम ३०४(अ),२७९ भा.दं.वि. सहकलम १३४,१७७ मो.वा.का. या गुन्हयातील आरोपी वाहन चालक रंजितसिंग कमलजितसिंग सैनी वय ३५ वर्षे रा. प्लॉट नं. ४५, मैत्री कॉलोनी, नारी रोड, जरीपटका, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३०४(अ) भा.दं.वि. अन्वये ०३ महिने साध्या कारावासाची शिक्षा व २०,०००/— रू. दंड व कलम २७९ भा.दं.वि. अन्वये ०१ महीना साध्या कारावासाची शिक्षा तसेच मोटर वाहन अधिनियम कलम १३४, १७७ अन्वये १०० रू. दंडाची शिक्षा ठोठावली.

दिनांक २१.०१.२०१७ चे ०८.०० वा चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत राहणारे फिर्यादी रामभाऊ देविदास पाटील रा. प्लॉट नं. ८८, कपिल नगर, जरीपटका, नागपूर हे आपले सासऱ्यांचे अंत्यविधी करीता मैत्री कॉलोनी येथे गेले असता, आरोपी स्कुलबसचा चालक याने त्याचे ताब्यातील स्कुलबस क्र. एमएच ४० वाय ५७८६ ही अतिशय वेगाने व बेदरकारपणे, निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचा मुलगा नामे साहील रामभाऊ पाटील वय ०९ वर्षे ह्याचा अपघात करून त्याचे मृत्युस कारणीभुत होवून पळून गेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे जरीपटका येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २१.०१.२०१७ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तत्कालीन तपासी अधिकारी पोहवा. कमलकांत रोकडे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्री एस. एस. सावळकर यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री राकेश कोचर यांनी काम पाहिले. सदर गुन्हयात कोर्ट पैरवी अधिकारी मपोहवा. प्रतिमा काणेकर व पोहवा योगेश बोंद्रे यांनी काम पाहिले

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे लकडगंज :— फसवणूक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी अश्विनी सुनिल वानखेडे वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. २३, वाठोडा रोड, शांती ले आऊट, सालासार विहारजवळ, नंदनवन, नागपूर हया पोलीस ठाणे लकडगंज हद्दीतील मनप्पुरम गोल्ड लोन फायनान्स कंपनी, वर्धमान नगर शाखेत मॅनेजर म्हणून काम करतात. आरोपी कपिल सुनिल कावळे वय २८ वर्ष रा. प्लॉट क्र. ७०, साई कॉलनी, नागपूर स्कुलच्या मागे, भरतनगर, पारडी, नागपूर हा नमुद शाखेचा ग्राहक असून तो नेहमी गोल्ड लोनकरीता येत असल्याने त्याची फिर्यादीसोबत ओळख होती. दिनांक १२.०३.२०२६ चे १२.०० वा. ते दिनांक २१.०४.२०२६ चे १६.०० वा. चे दरम्यान, आरोपीने फिर्यादीस विश्वासात घेऊन सांगितले की, त्याचे सोने एचडीएफसी बॅक येथे गहाण आहे व तेथे व्याजदर जास्त असल्याने ते परवडत नाही. त्यामुळे ते

सोने सोडवून मनप्पुरम गोल्ड लोनचे फिर्यादी काम करीत असलेल्या शाखेत ठेवायचे आहे. आरोपीने फिर्यादीचा विश्वास संपादन करुन एचडीएफसी बॅकेतून सोने सोडविण्याकरीता फिर्यादीचे शाखेकडून ३०,००,०००/– रु. ची उचल केली. परंतु आरोपीने पैसे भेटल्यावर कोणतेही प्रकारचे सोने फिर्यादीचे मनप्पुरम गोल्ड लोन कंपनीत सादर केले नाही. याबाबत फिर्यादीने आरोपीस विचारणा केली असता, आरोपीने उडवाउडवीचे उत्तरे देऊन फोन बंद केला. आरोपीने फिर्यादीचा अन्यायाने विश्वासघात करुन फिर्यादीचे गोल्ड लोन शाखेची ३०,००,०००/– रू. ची आर्थिक फसवणूक केली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून व अर्ज चौकशीवरुन पोलीस ठाणे लकडगंज येथे पोउपनि सुरज कोल्हे ९०११३५८३९३ यांनी आरोपीविरूध्द कलम ३१६,३१८(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे मानकापूर :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १९.०४.२०२६ चे ०८.०० वा. ते दिनांक २८.०४.२०२६ चे २०.३५ वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे मानकापूर हद्दीत, प्लॉट नं. ३७५, विशाखा सोसायटी, निर्मल नगर जवळ, गोरेवाडा, नागपुर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती ज्योती संजय कुशवाहा वय ३९ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह लग्नसमारंभाकरीता नातेवाईकांकडे पन्ना (मध्यप्रदेश) येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे लोखंडी मेनगेट व मुख्य दाराचे कुलूप व कडी–कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीमधील स्टीलची पेटी व पर्समध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने एकुण किंमती ३,४६,६००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापूर येथे पोउपनि. रोहन पाटील ७७२१८१५१३० यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे ईमामवाडा</u> :–** दिनांक २९.०४.२०२६ चे ११.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ईमामवाडा हद्दीत सरदार पटेल चौक येथील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६५ वर्षे वयाचे इसम बेशुध्द अवस्थेत मिळून आले. पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी अथवा नातेवाईकांनी पोलीस ठाणे ईमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी फिर्यादी वैभव विनोद बागडे वय २६ वर्षे यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे ईमामवाडा येथे पोउपनि. मारूती पोवार ९१४६९९३६२६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :–** सुनिल नाराणराव गरस्कर वय ५५ वर्षे, रा. प्लॉट नं. १०१, एकमत नगर, शाहू गार्डन स्कुलजवळ, मानेवाडा, बेसा रोड, नागपूर हे दिनांक २३.०४.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे भांडेवाडी हुडकेश्वर हद्यीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता, घरून कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आले नाहीत. **<u>वर्णन</u>** रंग–गव्हाळ, चेहरा–लांबट, डोळे–काळे,

बांधा– सडपातळ, उंची– ५ फुट, केस– काळे पांढरे, अंगात– पांढरे फुलबाहीचे` शर्ट व काळ्या रंगाचा चेकचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा– हिंदी/मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :–** सौ. वदंना अशोककुमार पाल वय ३० वर्षे रा. चंद्रभागा नगर, धांडे ले आऊट, उमेश शिवरकर यांचे घरी किरायाने, हुडकेश्वर, नागपूर हया दिनांक २४.०४.२०२६ चे १३.०० वा. पासुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. **<u>वर्णन</u>** रंग–गोरा, चेहरा– लांब, डोळे–काळे, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट २ इंच, केस– काळे लांब, अंगात– हिरव्या रंगाची कुर्ती व काळी लेगीन घातलेली आहे. भाषा– हिंदी बोलतात.

**<u>३) पोलीस ठाणे अंबाझरी</u> :–** खुशी दिनेश कर्णे वय २९ वर्षे रा. जयनगर, पांढराबोडी, संत रविदास दवाखान्याजवळ, अंबाझरी, नागपूर हया दिनांक २६.०४.२०२६ चे १६.०० वा. पासुन पोलीस ठाणे अंबाझरी हद्यीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. **<u>वर्णन</u>** रंग–गोरा, चेहरा– लांब, डोळे–काळे, बांधा–मध्यम, उंची– ४ फुट ५ इंच, केस– काळे लांब, अंगात– अबोली रंगाची टिशर्ट व प्लाजो घातलेला आहे. भाषा– मराठी/हिंदी बोलतात.



सुनिल



वदंना



खुशी

**स्वा/–**

**( मनोज राऊत )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**